गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८

दैनिक

# यश सिद्धि न्यूज

RNI NO. MAHMAR/2023/84162

YASH SIDDHI NEWS

● वर्ष २ रे ● अंक ५१ वा ● रविवार ०७ जुलै २०२४ ● पाने ४ ● किंमत ४ रु/-

| * Volume 2 | Issue 51 | Date : 07/07/2024 blow Sunday, Page 4 Price 4

# संसदेचे अर्थसंकल्पीय अधिवेशन २२ जुलैपासून



**दैनिक यशसिध्दि न्यूज** नवी दिल्ली : संसदेचे अर्थसंकल्पीय अधिवेशन २२ जुलै ते १२ ऑगस्टपर्यंत चालणार आहे. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन २३ जुलै रोजी अर्थसंकल्प सादर करणार आहेत. केंद्र सरकारच्या शिफारशीवरून राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी त्यांना मान्यता दिली आहे. संसदीय कामकाजमंत्री किरेन रिजिजू यांनी ही माहिती दिली आहे.१ फेब्रुवारी २०२४ रोजी अंतरिम अर्थसंकल्प सादर करण्यात आला. या वर्षी एप्रिलमध्ये लोकसभेच्या निवडणुका होणार होत्या, त्यामुळे सरकारने १ फेब्रुवारी रोजी अंतरिम अर्थसंकल्प सादर केला होता. अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांचा हा सहावा अर्थसंकल्प होता. यामध्ये गरीब, महिला, तरुण आणि शेतकरी यांच्यावर लक्ष केंद्रित करताना दिसत होते. आयकरात सवलत मिळाली नाही. जुन्या कर प्रणालीनुसार, केवळ २.५ लाख रुपयांपर्यंतचे उत्पन्न करमुक्त असेल. तथापि, कलम ८७ए अंतर्गत ५ लाख रुपयांपर्यंतच्या उत्पन्नावर कर वाचवता येतो. नवीन कर प्रणालीनुसार ३ लाख रुपयांपर्यंतचे उत्पन्न पूर्वीप्रमाणेच करमुक्त आहे. यामध्ये, ८७ए अंतर्गत, पगारदार व्यक्ती ७.५ लाखांपर्यंतच्या उत्पन्नावर आणि उर्वरित ७ लाखांपर्यंतच्या उत्पन्नावर सूट घेऊ शकतात. महिलांसाठी अपेक्षेपेक्षा कमी घोषणा झाल्या. ३ कोटी महिलांना करोडपती बनवण्याचे लक्ष्य ठेवण्यात आले होते. गर्भाशयाच्या मुखाचा कर्करोग टाळण्यासाठी ९ ते १४ वर्षे वयोगटातील मुलींना मोफत लसीकरण केले जाईल. सर्व अंगणवाडी आणि आशा सेविका आणि मदतनीस यांना आयुष्मान भारत योजनेच्या कक्षेत आणले जाईल. पिकांच्या किमान आधारभूत (एमएसपी) किमतीची व्याप्ती वाढवण्यात आली नाही. त्याचबरोबर ६,००० रुपयांच्या किसान सन्मान निधीमध्येही वर्षभरात वाढ करण्यात आली नाही. सरकारने कृषी क्षेत्राला १.२७ लाख कोटी दिले आहेत, जे गेल्या वेळेपेक्षा फक्त २टक्के जास्त आहे. गेल्या वेळी कृषी अर्थसंकल्पात १.२५ लाख कोटी रुपये मिळाले होते.

## रोजगारनिर्मितीसह विदर्भाच्या विकासावर भर : उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**नागपूर/दैनिक यशसिध्दि न्यूज**

विदर्भात अधिकाधिक रोजगारनिर्मिती होण्याच्या दृष्टीने सर्व सुविधांनी परिपूर्ण औद्योगिक क्षेत्र निर्माण करण्यावर आपण पूर्वी भर दिला. इथे आंतरराष्ट्रीय पातळीवरील उद्योग समूह आता नागपूरकडे आकर्षित होत असून विविध देशात कार्यरत असलेल्या जपान येथील होरिबा कंपनीच्या या नवीन अत्याधुनिक प्रकल्पाच्या माध्यमातून नागपूरच्या औद्योगिक क्षेत्राला नवी ओळख मिळाली असल्याचे प्रतिपादन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

बुटीबोरी औद्योगिक वसाहतीमध्ये असलेल्या जपानस्थित होरिबा या कंपनीच्या सुविधा केंद्राच्या कोनशीलेचे अनावरण केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग



मंत्री नितीन गडकरी आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले. बुटीबोरी येथील कंपनीच्या परिसरात आयोजित केलेल्या या समारंभात उपमुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. यावेळी कंपनीचे अध्यक्ष आत्सूशी होरिबा, होरिबा इंडियाचे अध्यक्ष डॉ. जय हाकू, कॅार्पोरट ऑफिसर डॉ. राजीव गौतम, माजी खासदार डॉ. विकास महात्मे यांच्यासह मान्यवर यावेळी उपस्थित होते.उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस पुढे म्हणाले की, बुटीबोरी औद्योगिक वसाहतीमध्ये सुमारे २०० कोटी रुपयांच्या गुंतवणुकीतून उभारलेल्या या प्रकल्पामुळे भारतातील सुमारे ३० हजार डायग्नॉस्टिक लॅब यांना । **पान २ वर**

## १०८ रुग्णवाहिका सेवेमुळे १० वर्षात मिळाला १ कोटी रूग्णांना लाभ

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

मुंबई : आपत्कालीन वैद्यकीय परिस्थितीत 'डायल १०८' ही रूग्णवाहिका सेवा अत्यंत महत्त्वाची ठरली आहे. सार्वजनिक आरोग्य विभागाच्या या सेवेने राज्यातील नागरिकांची आरोग्य सेवा करीत तब्बल १० वर्ष पूर्ण केले आहे. या १० वर्षाच्या कालावधीत १०८ रूग्णवाहिकेची सेवा रूग्णांना जीवनदान देणारी ठरली आहे. अशा या संजीवनी देणाऱ्या रूग्णवाहिका सेवेने राज्यात १ कोटी ३ हजार ४४६ रूग्णांची विनामूल्य आरोग्य सेवा केली आहे.




कुणी आजारी असेल, अपघात झाला असेल किंवा वैद्यकीय सेवेची मदत असेल तर १०८ रूग्णवाहिका सेवेसाठी तत्पर असते. आपत्कालीन आरोग्य सेवांसाठी 'एक-शून्य-आठ' हा विनामूल्य दूरध्वनी क्रमांक आहे. राष्ट्रीय आरोग्य अभियान, सार्वजनिक आरोग्य विभाग व भारत विकास ग्रुपच्या (बीव्हीजी इंडिया) संयुक्त विद्यमाने ही सेवा अव्याहतपणे राज्यात ठिकठिकाणी चालविण्यात येत आहे. महाराष्ट्रात या सेवेची सुरूवात जानेवारी २०१४ मध्ये झाली. राज्यात सध्या ९३७ रूग्णवाहिका असून सर्व रूग्णवाहिकेत पल्स ऑक्सिमीटर, मेडीकल ऑक्सिजन यंत्रणा सज्ज आहे. ही देशातील अविरत २४ तास डॉक्टर व अत्यावश्यक वैद्यकीय सुविधेसह असणारी एकमेव यंत्रणा आहे. राज्यात १०८ रूग्णवाहिकेमध्ये ४० हजार २१३ प्रसुती करण्यात येऊन त्यांना सुखरूप सोडण्यात आले आहे. तसेच ४ हजार ३४ रूग्णांना कृत्रिम श्र्वासोच्छवास (व्हेंटीलेटर) ची सुविधा देण्यात येऊन त्यांचे प्राण वाचविण्यात आले आहे.

राज्यात कोणत्याही ठिकाणावरून मोबाईल अथवा दूरध्वनीवरून १०८ क्रमांक डायल करताच वैद्यकीय आपत्कालीन परिस्थितीत रूग्णांना विनामूल्य आणि वेळेत रूग्णवाहिका सेवा देण्यात येते. सेवा सुरू झाली। **पान २ वर**

## आषाढी यात्रेमध्ये शहरात मास, मटन विक्रीस सक्त मनाई

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

पंढरपूर/प्रतिनिधीःआषाढी सुद्धा एकादशी १७ जुलै २०२४ रोजी असून, आषाढी यात्रा कालावधी दिनांक ०६ जुलै ते २१ जुलै आहे, या यात्रावर कालावधीत शहरात श्री विठ्ठल रुक्मिणी दर्शनासाठी मोठ्या प्रमाणात भावी भक्त येतात या वारी कालावधीमध्ये दिनांक १६ ते २० जुलै २०२४ पर्यंत पंढरपूर शहरातील मांस, मटन, मासे, व प्राणी कत्तल यावर बंदी घालण्याचे आदेश उपविभागीय अधिकारी सचिन इथापे यांनी निर्मनित केले आहेत शहरातील कायदा व सार्वजनिक सुव्यवस्था राखण्यासाठी फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ अन्वये दिनांक १६ ते २० जुलै २०२४ या कालावधी शहरात मास, मटन, मासे विक्री करण्यावर बंदी घालण्यात आलेले आहे

## श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाच्या वतीने कुस्तीगरांसाठी स्वामींचा प्रसाद रुपी खुराकाचे कीट वाटप

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

अक्कलकोट/प्रतिनिधीः श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व प्रमुख कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली आणि संकल्पनेतून तालुक्यातील सराव करण्याऱ्या गोरगरीब 'कुस्तीगरांसाठी स्वामींचा प्रसाद रुपी खुराकाचे कीट वाटप करण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत न्यासाकडून जुलै महिन्यातील कीटचे वाटप शनिवारी करण्यात आले. दरम्यान गेल्या मकर संक्रांतीच्या दिवशी सदरचा उपक्रम सुरू करण्यात आला होता. प्रारंभी ५० जणांना किट देण्यात आले होते. गेली ३६ वर्षे अविरतपणे अन्नदानाचे स्वामीकार्य करणारे श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ हे न्यास संपूर्ण देशात ख्यातनाम आहे. संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व त्यांचे पुत्र न्यासाचे प्रमुख कार्यकारी विश्र्वस्त अमोलराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली न्यासाच्या कार्यास झळाळी प्राप्त झाली आहे. अन्नछत्र मंडळात दररोज लाखो भाविक महाप्रसादाचा लाभ घेतात.

याबरोबरच समर्थ महाप्रसाद सेवे बरोबरच आता तालुक्यातील गोरगरीब कुस्तीगीरांसाठी न्यासाकडून प्रसाद रुपी खुराकाचे वाटप प्रती महिन्यास करण्यात येत आहे. या कीटमध्ये कुस्तीगीरांना आवश्यक तूप, बदाम, खारीक, बडीसोप, खसखस, इलायीची, धने आदि पदार्थांचे कुस्तीगरांसाठी श्रींचा प्रसाद रुपी खुराकात या जीनंसांचा




समावेश आहे. तालुक्यातील कुस्तीगीर हे सरावाकरिता कोल्हापूर, पुणे, सोलापूर, धाराशिव, संभाजीनगर आदि ठिकाणी कुस्तीचा सराव करीत आहेत. मात्र त्यांची गरज ओळखून तालुक्याच्या चांद्या पासून बांध्यापर्यंतच्या कुस्तीगरांचा एका विशेष टीमच्या माद्यमातून सर्वे करून तालुक्यातील ७६ पैलवानांची निवड करण्यात आली आहे. दरम्यान । **पान २ वर**

## वागदरी शिरवळ वाडी रस्त्या मधील खड्डे भुजवणे काम सुरुवात

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

वागदरी/प्रतिनिधीः वागदरी ते अक्कलकोट हायवे रोडवरती वागदरी पासून दिड किलोमीटर अंतरावर शिरवळ वाडी फुलावरती खुप मोठ मोठे खड्डे पडलेले होते त्याबाबत



दैनिक यश सिध्दी न्युज वागदरी प्रतिनीधी महादेव सोनकवडे यांनी आवाज उठवले होते

त्याबाबत दैनिक यश सिध्दी न्युज ५ जुलैच्या अंकात बातमी प्रकाशन करण्यात आले होते. रस्त्यावर मोठे मोठे खड्डे पडले होते. या खड्ड्यांमुळे अनेक लहान मोठे जीवघेणे अपघात होण्याचा संभव होते. सध्या पावसाळा असल्याने खड्यात पाणी साचल्यामुळे खड्डे दिसून येत नव्हते याबाबत राष्ट्रीय रस्ते महामार्ग विभाग व सार्वजनीक बांधकाम विभागाने यांची त्वरित दखल घेवून लवकर खड्डे बुजवून घेण्यात यावे.अन्यथा होणाऱ्या परिणामांस सार्वजनिक बांधकाम विभाग राहील यांचे तातडीने दखल घेऊन खड्डे भुजवून घ्यावे असे महादेव सोनकवडे यांनी इशारा दिले होते.महादेव सोनकवडे यांची वागदरी पंचक्रोशी कौतुक होत आहे

दैनिक यश सिध्दी न्यूजचे दणका

## आषाढी वारी सोहळ्यात भाविकांची वाढती संख्या विचारात घेवून सुविधा द्याव्यात : पालकमंत्री चंद्रकांत पाटील

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

पंढरपूर/प्रतिनिधीः आषाढी शुद्ध एकादशी सोहळा १७ जुलै २०२४ रोजी होणार असून, या सोहळ्यासाठी मोठ्या प्रमाणात वारकरी भाविक येतात तसेच दिवसेंदिवस पायी पालखीसोहळ्या सोबत येणाऱ्या वारकरी भाविकांची संख्याही वाढत आहे.आषाढी सोहळ्यासाठी भाविकांची वाढती संख्या विचारात घेवून आवश्यक सर्व दर्जेदार पायाभूत सुविधा पुरवाव्यात त्यांची कोणतीही गैरसोय होणार नाही, याची संबंधित सर्व यंत्रणांनी दक्षता घ्यावी अशा सूचना उच्च व तंत्र शिक्षण, वस्त्रोद्योग व संसदीय कार्यमंत्री तथा पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिल्या.

आषाढी वारी नियोजनाच्या आढावा बैठकीत ते बोलत होते. कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयाच्या सभागृहात आयोजित या बैठकीस खासदार प्रणिती शिंदे,आमदार समाधान आवताडे, मंदिर समितीचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, मुख्य कार्यकारी अधिकारी मनीषा आव्हाळे, जिल्हा पोलीस अधिक्षक शिरीष सरदेशपांडे, अपर जिल्हाधिकारी मोनिका सिंग ठाकूर,सा.बां.कार्यकारी अभियंता संजय माळी, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनकर,जिल्हा नियोजन अधिकारी अनिल पवार, उत्पादन शुल्कचे अधिक्षक नितीन धार्मिक, जिल्हा नगर प्रशासन अधिकारी वि.ना पवार, प्रांताधिकारी सचिन इथापे, मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके तसेच पालखी सोहळा प्रतिनिधी, नागरिक उपस्थित होते.



यावेळी पालकमंत्री पाटील म्हणाले, पंढरपूर येथे आषाढी वारीच्या अनुषंगाने संपूर्ण राज्यातून व अन्य राज्यातून मोठ्या प्रमाणावर वारकरी येतात. प्रशासनाने वारकरी हा केंद्रबिंदू मानून त्यांना सर्व सोयी सुविधा उपलब्ध करून द्याव्यात पालखी मार्गावर तसेच पालखी मुक्कामाच्या ठिकाणी मुबलक व स्वच्छ पिण्याचे पाणी, फिरती शौचालये, आरोग्य सुविधांची उपलब्धता करावी. पालखी सोहळ्यांना पालखी मार्गाबरोबरच पालखी तळावर कोणतीही अडचण येणार नाही याची दक्षता घ्यावी. पालखी सोहळा जिल्ह्यात दाखल होण्यापूर्वी वारकऱ्यांसाठी सर्व सुविधांची कामे पूर्ण करावीत. अशा सूचनाही । **पान २ वर**

# आम्ही आज कदाचित लढाई हरलो असू, युद्ध मात्र जिंकणारच जिंकणार : डॉ.बाबासाहेब आंबेडकर

## फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलच्या वतीने ५४ वी वैचारीक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळा संपन्न

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

छत्रपती संभाजी नगर/प्रतिनिधीः समाज जीवनात कार्यरत बुद्ध, फुले, शाहू, आंबेडकराईट विचारधारेच्या हितचिंतकांना जागृत करून वैचारिक आंदोलनाचा कारवाँ पुढे घेऊन जाण्यासाठी समग्र आंदोलन समजून घेत असताना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी वेळोवेळी घेतलेल्या भूमिका आणि त्यावेळी व्यक्त केलेले विचार समजून घेणे आवश्यक आहे. आपण सर्वांना ज्ञात आहेच की, २५ जून १९४६ ला मुंबई येथील सभेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते की, आम्ही आज कदाचित लढाई हरलो असू, युद्ध मात्र जिंकणारच जिंकणार. या विधानाच्या ७८ व्या वर्धापनदिनानिमित्त वर्तमान काळात आपण कुठे आहोत? समग्र चळवळीचे नेतृत्व, कार्यकर्ते, संस्था, संघटना, अनुयायी, हितचिंतक नेमके काय करीत आहेत? आपली त्यात भागीदारी किती? यावर विचारमंथन व्हावे म्हणून सदरील विषयावर फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कल व दि आल इंडिया नाग असोसिएशन च्या संयुक्त विद्यमाने ५४ व्या वैचारिक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळेचे ३० जून २०२४ ला आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी उद्घाटनपर मार्गदर्शन करताना महेंद्र खिल्लारे म्हणाले की, युद्ध हे सकारात्मक व नकारात्मक अशा दोन शक्तीत होत असते. युद्धाचे फलित म्हणजे त्यांनी अस्तित्वात आणलेल्या व्यवस्थेचे परिणामच असतात. आपल्या चळवळीचे राजकीय अस्तित्व संपुष्टात आलेले असताना आपण जीवंत कसे आहोत? हा एक गंभीर प्रश्न आपल्यासमोर आ वासून उभा आहे. भारताचे इतिहास समजून घेताना सवर्णांसोबत झालेल्या युद्धात नागांची झालेली हार समजून घेणे आवश्यक आहे. ज्यामुळे प्रज्ञा शीलावर आधारित नाग समुदायाच्या तात्विक सभ्यतेचा –हास झाला. पुढे या सभ्यतेला पुनरुज्जीवीत करण्याचा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी प्रयत्न केला ज्यातून आपल्या अस्तित्वाला नवा आयाम निर्माण होऊ लागला. ज्यामुळे वाड्यावरचा माणूस माड्यावर जाऊ लागला. हे मात्र प्रस्थापितांना पाहवले जात नसल्याने संघर्ष अजूनही संपलेला नाही. म्हणून युद्धातील दुर्बल घटकावर लक्ष केंद्रित करून उपाय योजनांची अंमलबजावणी केली पाहिजे. भारताचा सातबारा सम्राट अशोकांच्या नांवावर आहे. पूर्वी संपूर्ण जंबुद्वीप एकसंघ होता. इ. स. नाच्या पाचव्या शतकात इझाईल सारख्या राज्यात मोहम्मदी खान सारख्या बौद्ध व्यक्ती अस्तित्वात होत्या. ज्या समाजाकडे गती आहे, तो समाज प्रभावशाली ठरेल. मात्र युद्धात हरलेल्यांची 'आपेश मरनाहून वोखटे' अशी स्थिती झालेली असते. अनेक संघर्षात्मक लढाया लढून आपणास युद्धातील अस्तित्व कायम ठेवावे लागेल. आधुनिक काळात अनेक प्रकारची आयुधे उपलब्ध असली तरी कौशल्य उपलब्ध नसल्याने युद्ध जिंकण्याचे अनुषंगाने साशंकता आहे. तरी सावधपणे मार्गक्रमण करावे लागेल.



याप्रसंगी पी. के. परदेशी म्हणाले की, आरएसएस हे एक भयानक संघटन आहे. आपली माणसे पर्याय उपलब्ध नसल्याने अज्ञानामुळे त्यांच्या अधिपत्याखाली कार्यरत असतात. इतरांना आधार देताना आपल्या कार्याला गती दिली पाहिजे. आपले पूर्वज कर्ज न घेता स्वकष्टाने पुढे जात असत. ज्येष्ठांच्या सल्ल्याचा आदर केला पाहिजे. इतरांना दोष देण्यापेक्षा आपल्या क्षमतेच्या बळावर युद्धाला सामोरे गेले पाहिजे. महादेव डांबरे म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लढाईत कधीही हार मानली नाही. त्यांनी लढाई आणि युद्ध दोन्ही जिंकलेत. सिमला परिषदेत गांधींनी अस्पृश्यांना प्रतिनिधित्व दिले जाणार नाही असे जाहिर केले होते. आज संसदेत आपले १३१ प्रतिनिधी आहेत. पण ते आपल्या विचारांचे नाहीत. १९८४ ला भाजपाचे दोनच खासदार होते आज ते देश गिळंकृत करण्याच्या मार्गावर आहेत. आम्ही ब्राह्मणी कावा समजून घेण्यात कमी पडत आहोत. आपल्या अधोगतीला आपणच जबाबदार आहोत. २९ पक्षांनी युती करून अटल बिहारी वाजपेयी यांनी सरकार स्थापन करून चालविल्याचा इतिहास साक्षी आहे. आपले सर्व गट तट एकत्र झाले, तर आपणास कुणीही हरवू शकणार नाहीत. सोहेल पटेल म्हणाले की, अस्पृश्य व्यक्ती काही प्रमाणात विकसित होत असल्या तरी देशाचे प्रथम नागरिक द्रौपदी मूर्मू व रामनाथ कोविंद यांना मंदिरात प्रवेश नाकारण्यात आला होता. याला इतिहास साक्षी आहे. म्हणून संसदेत आपल्या विचारांचे प्रतिनिधी पाठवून युद्ध जिंकण्याची तयारी केली पाहिजे. मोहसिन पटेल म्हणाले की, अस्पृश्यांना शिक्षण मिळावे यासाठी प्रयत्न व्हायला हवेत. अथक परिश्रम करून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी गोलमेज परिषदेतून स्वतंत्र मतदारसंघ मिळवून आणले होते मात्र गांधींनी उपोषणाने पुणे करारान्वये त्या तरतुदीवर पाणी फेरल्या गेले. म्हणून वैचारिक क्रांतीची आवश्यकता आहे.

प्रमुख वक्ते एड. विलास रामटेके म्हणाले की, समाजात मित्रता विकसित करण्यासाठी समाजाची पुनर्रचना करण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी समता स्थापित करणे आवश्यक आहे करिता समता विकसित करण्यासाठी प्रयत्न व्हायला हवेत. कर्मकांड व ज्ञानकांडाची मिमांसा करून वैज्ञानिकतेकडे वळले पाहिजे. बुद्धाच्या तत्त्वज्ञानात भेसळ करून प्रचारित केले जात आहे. त्याची दखल घेऊन आपण सजग राहिले पाहिजे.

कार्यशाळेचा अध्यक्षीय समारोप करताना फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलचे संचालक बी. बी. मेश्राम म्हणाले की, प्रथमतः मी त्या सर्व वर्तमान पत्राच्या संपादक व टीमचे आभार व्यक्त करतो ज्यांनी फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलच्या बातम्यांना ठळक प्रसिद्धी दिली आहे. लढाई हे अल्पकालीन उद्दिष्ट असून युद्ध हे दीर्घकालीन उद्दिष्ट आहे. लढाईत एखाद्या मुद्यावर संघर्ष केला जातो तर अनेक लढाया मिळून युद्ध जिंकले जाते. चळवळीतील कार्यकर्त्यांमध्ये लायकी, क्षमता आणि कौशल्य निर्माण करण्यासाठी आपण त्यांना प्रशिक्षित केले पाहिजे. जे कार्य आपण फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलच्या वतीने पार पाडण्याचा प्रयत्न करीत आहोत. त्यासाठी आपण वैयक्तिक व सांघिक दृष्टीने सातत्याने मूल्यांकन करीत असताना आपल्या व शत्रूच्या शक्ती, दुर्बलता, संधी आणि आव्हाने (डथटढ : ढढठएछहद्यक, थए-घछएडडएड, जझझजठढणछखखएड, ढक्ष्ट-ढड) यांचा आढावा घेऊन वास्तविकता स्विकारली पाहिजे. जसे एखाद्या महानगरपालिका परिसरातील कार्यकर्ता त्याच्या परिसरात सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी अहोरात्र झटत असतो परिणामी जनता त्याचा प्रतिनिधी म्हणून स्वीकार करतो. हे अनेक लढाया यशस्वी केल्याने नगरसेवक म्हणून निवड होणे हे युद्ध जिंकल्या सारखेच आहे. याचा देश पातळीवर विचार होणे आवश्यक आहे. १९४५ च्या सिमला परिषदेत हिंदुस्थान सरकारात अस्पृश्यांचा एकही प्रतिनिधी घेण्यास गांधींनी नकार दिला होता. तसेच गांधींनी जगजीवनराम यांना स्पष्ट सांगितले होते की, मध्यवर्ती सरकारात अस्पृश्यांच्या प्रतिनिधीला स्थान मिळणार नाही. मात्र झाले उल्टे ज्याला बाबासाहेब आंबेडकरांनी चळवळीचे फलित म्हटले आहे. हे व्यापक प्रमाणात सद्यस्थितीत घडवून आणण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी म्हटल्याप्रमाणे ट्रेनिंग स्कूल फॉर एंट्रंस टू पॉलिटिक्सची समाजजीवनात अंमलबजावणी करण्याची नितांत आवश्यकता आहे जेणेकरून आम्ही आज कदाचित लढाई हरलो असू, युद्ध मात्र जिंकणारच जिंकणार हे आव्हान आपणांस साकार करता येईल. करिता आपण सर्वांनी आपली समर्पक भूमिका पार पाडण्याची नितांत आवश्यकता आहे.

या कार्यशाळेला ए. ए. खिल्लारे, एड. व्ही. डी. रामटेके, महादेव डांबरे, पी. के. परदेशी, बी. बी. मेश्राम, मोहसिन पटेल, सोहेल पटेल, इत्यादी प्रतिनिधी उपस्थित होते. अशाप्रकारे आभार प्रदर्शनाने हर्षोल्हासात कार्यशाळेची सांगता झाली.

# संपादकीय

## अस्वस्थता बोलून दाखवली होती..

विधानसभा निवडणुकीत त्याची पुनरावृत्ती होऊ नये याची काळजी भाजपचे नेते घेताना दिसत आहेत. ओबीसी नेत्या पंकजा मुंडे, सदाभाऊ खोत, परिणय फुके, अमित गोरखे आणि योगेश टिळेकर यांना विधान परिषदेची उमेदवारी देऊन भाजपने असंतुष्टांसह ओबीसी नेते दुखावणार नाहित, याची काळजी घेतल्याचे दिसून येत आहे. पंकजा यांना पुन्हा राज्यातील राजकारणात प्रवेशाचा मार्ग मोकळा झाला आहे. त्याचबरोबर धनंजय मुंडेंचा विधानसभेचा मार्ग सुकर झाला आहे. लोकसभा निवडणुकीत पंकजा यांचा ज्येष्ठ नेते शरद पवार गटाचे बजरंग सोनावणे यांनी पराभव केला होता. २०१९ च्या विधानसभेतील पराभवानंतर पंकजा यांना बसलेला हा दुसरा मोठा धक्का होता. पंकजा यांचे राजकीय पुनर्वसन करण्याची मागणी त्यांचे समर्थक करत होते. लोकसभा निवडणुकीत मराठा–ओबीसी वादाचा फटका भाजपला बसला होता. त्यामुळे मुंडेंना नाराज करणे विधानसभा निवडणुकीसाठी धोकादायक ठरण्याची शक्यता होती. दुसरीकडे, राष्ट्रवादी सोबत असल्याने धनंजय मुंडे यांना परळी विधानसभा मतदारसंघ सोडणे भाजपला भाग आहे. यातून मार्ग काढत भाजप नेत्यांनी पंकजा मुंडेंना थेट विधान परिषदेत पाठवण्याचा निर्णय घेतल्याचे दिसत आहे. पंकजा यांना मुख्यमंत्रिपदाची स्वप्ने पडली होती. जनतेच्या मनातील मुख्यमंत्री असे सांगत त्यांनी उघडपणे मुख्यमंत्री होण्याची इच्छाही प्रकट केली होती. हीच इच्छाशक्ती त्यांना घातक ठरली. नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत पंकजा मुंडेंच्या पदरी अपयश आले. लोकसभा निवडणुकीत भाजपला महाराष्ट्रात बसलेला धक्का पंकजा मुंडेंच्या राजकीय पुनर्वसनाचा राजमार्ग ठरला आहे. पंकजा यांना विधान परिषदेत पाठवण्याचा निर्णय भाजपकडून घेण्यात आला आहे. भाजपकडून आता जपून पावले उचलण्यात येत आहेत. विधान परिषदेच्या बारापैकी पाच जागांवर भाजपचे उमेदवार निवडून येणार आहेत. त्यामुळे भाजपने विधान परिषदेसाठी पंकजा यांची उमेदवारी अखेर जाहिर केली आहे. अलीकडे सांगली येथे झालेल्या महायुतीच्या मेळाव्यात निवडणूक आली की भाजपला आमची आठवण येते, अशा शब्दात खोत यांनी आपली अस्वस्थता बोलून दाखवली होती

पान १ वरुन

## रोजगारनिर्मितीसह विदर्भाच्या..

अत्यावश्यक महत्त्वाची उपकरणे पुरवली जाणार आहेत. तपासणी प्रयोगशाळेसाठी लागणारे सोल्यूशन्स व इलेक्ट्रॉनिक चिप्सवर होरीबा कंपनीचे कार्य असून वैद्यकीय क्षेत्रासाठी ही निर्मिती महत्वाची आहे. सुमारे १२ एकर जागेवर उभारलेल्या या कंपनीचे भूमिपूजन तीन वर्षांपूर्वी माझ्या हस्ते करण्यात आले होते. अत्यंत युद्धपातळीवर हे काम कंपनीने पूर्ण केल्याबद्दल आनंद झाल्याचे उपमुख्यमंत्री म्हणाले.

नागपूर हे आता केवळ आकर्षक महानगरच नव्हे तर पायाभूत सुविधांनी परिपूर्ण असलेले महानगर झाले आहे. कंपनीच्या भविष्यात लागणाऱ्या प्रकल्पांना जी जागा व पायाभूत सुविधा लागेल ती उपलब्ध करून देऊ असे त्यांनी स्पष्ट केले.

जगातील मेडिकल टुरिझम हबमध्ये भारताने अल्पावधीत संपूर्ण जगाचे लक्ष वेधून घेतले आहे. आजच्या तुलनेत आपण जगात दहाव्या स्थानी आहोत. इथल्या वैद्यकीय क्षेत्रातील जागतिक पातळीवरील सुविधा व तज्ज्ञ वैद्यकीय सेवांच्या माध्यमातून आपण जगाला वेगळी ओळख देऊ. याचबरोबर भारत आता सेमी कंडक्टरचा हब ठरला आहे.

होरीबा कंपनीने इथे सेमिकंडक्टर प्रकल्पाबाबत विचार करावा. अशा नवीन प्रकल्पांना सहकार्यासाठी आम्ही सदैव तत्पर असल्याचे उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. होरीबाचे नागपूर येथील सुविधा केंद्र हे आदर्शाचा मापदंड ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.नागपुरातील उद्योग वसाहतींमध्ये विविध औद्योगिक कंपन्या आल्यास स्थानिक रोजगारास चालना मिळेल. विदर्भाची सामाजिक आणि आर्थिक प्रगती व्हावी हा प्रयत्न असल्याचे केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी म्हणाले. आत्मनिर्भर भारत ही संकल्पना प्रत्यक्षात साकारण्यासाठी हे पाऊल महत्वाचे ठरेल आहे. भारत जगातील तिसरी मोठी अर्थव्यवस्था व्हावी यासाठी सर्व स्तरातून प्रयत्न होणे गरजेचे असे गडकरी यांनी स्पष्ट केले.उद्योग क्षेत्राला प्रोत्साहन देण्याचे शासनाचे धोरण राहिले आहे. यासाठी सर्व प्रकारचे सहकार्य करण्यात येईल. औद्योगिक वसाहतींचा विकास व्हावा यासाठी कटिबद्ध असल्याचे त्यांनी सांगितले.

## १०८ रुग्णवाहिका सेवेमुळे

तेव्हापासून, जून २०२४ पर्यंत अपघाती घटनांमध्ये रुग्णवाहिकेमधून ५ लाख २२ हजार ६८२ रुग्णांना उपचारासाठी रुग्णालयात पोहचविण्यात आले आहे. तसेच आगीच्या घटनांमध्ये २९ हजार २५३, हृदयरोगामध्ये ७५ हजार ५९३, उंचावरून पडून जखमी झालेल्या १ लाख ५८ हजार ६८४, विषबाधा प्रकरणी २ लाख ३२ हजार ४२६, प्रसुतीवेळी १६ लाख ५६ हजार ९४, शॉक किंवा वीज पडून जखमी या घटनांमध्ये ६ हजार ९४९ रूग्णांना सेवा देण्यात आली आहे. अशा प्रकारे राज्यात १ कोटी ३ हजार ४४६ रूग्णांना आरोग्य सेवा १०८ च्या माध्यमातून मिळाली आहे. महाराष्ट्र आपत्कालीन वैद्यकीय सेवा या नावाने असलेल्या १०८ ही रूग्णवाहिका सेवा सुरू आहे.याव्यतिरिक्त राज्यात नाशिक येथील महाकुंभमेळा कालावधीत १ लाख ७ हजार २०० रूग्णांना सेवा दिली. महाराष्ट्राची अस्मिता असलेल्या पंढरपूरच्या वारीमध्ये २ लाख ८९ हजार ६४६ आणि गणपती उत्सवात ४ हजार ६८४ रूग्णांना १०८ ने सेवा दिली आहे. या सेवेमध्ये सुधारणा करण्यासाठी किंवा सेवेच्या समाधानाबाबत नागरिकांचा प्रतिसाद (फिडबॅक) देखील घेण्यात येतो. राज्यात सेवेबद्दल ६ लाख ७४ हजार ५४२ प्रतिसाद प्राप्त झाले आहे. यामध्ये ८१ हजार १५५ एकदम उत्तम, ५ लाख ७० हजार ५९४ उत्तम आणि २२ हजार ७९३ चांगला प्रकारातील आहे.राज्यात १०८ रूग्णवाहिका सेवा संजीवनी आहे. गरीब रुग्णांना या सेवेमुळे वेळेत उपचार मिळण्यासाठी मोलाची मदत झाली आहे. त्यामुळे त्यांना संजीवनीच मिळाली आहे. ही सेवा कोरोना काळात जीवनदायी ठरली आहे.

## स्वामींचा प्रसाद रुपी..

याकामी महाराष्ट्र केसरी पै.मौला शेख बादोला, पै.महेश कुलकर्णी, सरफराज शेख, अतिश पवार यांचे सहकार्य लाभले.

याप्रसंगी न्यासाचे उपाध्यक्ष अभय खोबरे, सचिव शामराव मोरे, मनोज निकम, निखिल पाटील, गोटू माने, प्रवीण घाटगे, राजेंद्र पवार, अभियंता अमित थोरात, प्रसाद हुल्ले, एस.के.स्वामी, बाळासाहेब पोळ, सतीश महिंद्रकर, शहाजीबापू यादव, नामा भोसले, बाळासाहेब घाडगे, महांतेश स्वामी, समर्थ घाटगे, धनंजय निंबाळकर यांच्यासह सेवेकरी, कर्मचारी, भक्तगण बहुसंख्येने उपस्थित होते.

## आषाढी वारी सोहळ्यात भाविकांची

पालकमंत्री पाटील यांनी यावेळी दिल्या.तसेच बैठकीत मान्यवरांनी केलेल्या सूचनांनुसार आवश्यक त्या सर्व पूरक व्यवस्था उपलब्ध करून द्याव्यात असेही त्यांनी यावेळी सांगितले.

यावेळी जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद म्हणाले, पालखी सोहळे जिल्ह्यात प्रवेश केल्यानंतर सर्व भाविकांना , पालखी मार्ग व तळांवर आवश्यक सुविधा देण्याबाबत प्रशासन सज्ज असून आषाढी यात्रा सोहळ्यात भाविकांना कोणतीही अडचण येणार नाही या दृष्टीने सूक्ष्म नियोजन करण्यात आले आहे. पालखी सोहळ्यासोबत येणाऱ्या दिंड्यांना जादा पाण्याचे टँकर, फिरती शौचालय, सुरक्षा, आरोग्य, स्वच्छता आदी व्यवस्थाउपलब्ध करुन देण्यात येणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले

चांगावटेश्वर महाराज मठा समोर रथ लावण्याची व्यवस्था व्हावी. श्री मुक्ताबाई पालखी व श्री संत निवृत्तीनाथ पालखी सोहळ्यासोबत येणाऱ्या दिंड्यांना सुरक्षा व्यवस्था व मोबाईल टॉयलेटची व्यवस्था करावी. पंढरपूर शहरात मठांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. सुरक्षेच्या कारणास्तव भाविकांना आपल्या मठात जाण्यासाठी अडचणी निर्माण होतात याबाबत पोलीस प्रशासनाकडून सहकार्य मिळावे अशी मागणी यावेळी पालखी सोहळा प्रतिनिधी व वारकरी- भाविकांनी केली

खासदार प्रणिती शिंदे म्हणाल्या पंढरपूर अतिक्रमणे काढताना संबंधितांना नोटीस देऊन काढावीत तसेच त्यांचा सहानुभूतीपूर्वक विचार करावा असे यावेळी सांगितले.आमदार समाधान आवताडे म्हणाले आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर सध्या अतिक्रमण मोहीम सुरू असून, अतिक्रमणे काढताना संबंधितांना नोटीस देऊन अतिक्रमणे काढावीत जेणेकरून संबंधितांचे नुकसान होणार नाही. याची दक्षता घ्यावी असे यावेळी त्यांनी सांगितले. तत्पुर्वी पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी पत्राशेड येथील दर्शनरांगेला भेट देवून वारकरी भाविकांसाठी मंदिर समितीकडून देण्यात येणाऱ्या सोयी–सुविधाबाबत माहिती घेतली व आवश्यक सूचना दिल्या. तसेच दर्शन रांगेतील भाविकांशी यावेळी त्यांनी संवाद साधला.

# महाराष्ट्रातील सर्वोत्तम हॉटेलसाठी 'बालाजी सरोवर प्रीमियर, सोलापूर' ला आंतरराष्ट्रीय पर्यटन आणि आदरातिथ्य पुरस्कार

हॉटेल क्रिटिक्स आणि ब्लॉगर्स असोसिएशन तसेच वर्ल्ड वाईड बेस्ट हॉटेल डॉट कॉमच्या अध्यक्ष श्री. तजिंदर पाल सिंग यांनी बालाजी सरोवर प्रीमियर, सोलापूरला २०२४ चा महाराष्ट्रातील सर्वोत्तम हॉटेल म्हणून आंतरराष्ट्रीय पर्यटन आणि आदरातिथ्य पुरस्कार प्रदान केला आहे. वर्ल्ड वाईड बेस्ट हॉटेल डॉट कॉमने आंतरराष्ट्रीय आणि भारतातील अनेक हॉटेल्सचे यादृच्छिक ऑडिट केले. या ब्रँडने बालाजी सरोवर प्रीमियर, सोलापूरचा सुमारे १.५ वर्षांचा अभ्यास केला, ज्यामध्ये त्यांनी वेबसाइट्स, पाहुण्यांच्या अभिप्राय आणि स्थान यांचा समावेश केला. या सर्व वेबसाइटच्या आधारे त्यांनी बालाजी सरोवर प्रीमियरचे गुप्त ऑडिट केले आणि त्यानंतर महाराष्ट्रातील सर्वोत्तम हॉटेल म्हणून आंतरराष्ट्रीय पर्यटन आणि आदरातिथ्य पुरस्कार प्रदान केला. महाराष्ट्रातील हॉटेल्समध्ये आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सेवांसाठी हा पुरस्कार दिला गेला आहे.बालाजी सरोवर प्रीमियर, सोलापूर हॉटेलने आंतरराष्ट्रीय मानांकनाच्या निकषांची पूर्तता करत महाराष्ट्रातील सर्वोत्तम हॉटेल म्हणून नाव कमावले आहे. उत्कृष्ट सेवांच्या बळावर या हॉटेलने हा प्रतिष्ठेचा पुरस्कार मिळवला आहे. हॉटेलचे जनरल मॅनेजर श्री. ब्रिजेश सिंग यांना २०२४ चा महाराष्ट्रातील सर्वोत्तम महाव्यवस्थापक म्हणून आंतरराष्ट्रीय पर्यटन आणि आदरातिथ्य पुरस्कार ने सन्मानित करण्यात आले आहे. त्यांच्या कुशल व्यवस्थापनाने हॉटेलला उत्कृष्टतेच्या शिखरावर पोहोचवले आहे.



हॉटेलचे व्यवस्थापकीय संचालक श्री. राम रेड्डी यांना महाराष्ट्रातील २०२४ चा सर्वोत्तम व्यवस्थापकीय संचालक म्हणून आंतरराष्ट्रीय पर्यटन आणि आदरातिथ्य पुरस्कार ने सन्मानित करण्यात आले आहे. त्यांच्या दूरदृष्टीमुळे हॉटेल उद्योगात हा महत्त्वाचा टप्पा गाठला आहे. या पुरस्काराबद्दल बोलताना हॉटेलचे व्यवस्थापकीय संचालक श्री राम रेड्डी म्हणाले, हॉटेलमध्ये काम करणाऱ्या सर्व कर्मचाऱ्यांमुळे हा पुरस्कार शक्य झाला आहे. त्यामुळे हा पुरस्कार मी संपूर्ण बालाजी सरोवर प्रीमियर टीमला समर्पित करतो.

पुरस्कार वितरण समारंभात प्रमुख पाहुण्यांच्या उपस्थितीत हे पुरस्कार प्रदान करण्यात आले. श्री. तजिंदर पाल सिंग यांनी सर्व पुरस्कार विजेत्यांचे अभिनंदन केले आणि त्यांच्या कर्तृत्वाचे कौतुक केले. बालाजी सरोवर प्रीमियर, सोलापूर हॉटेलच्या या यशामुळे संपूर्ण महाराष्ट्राच्या पर्यटन आणि हॉटेल उद्योगाला प्रेरणा मिळाली आहे.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

# दक्षिण सोलापूर तालुक्यातील माळकवठे येथे वंचित बहुजन आघाडी शाखेचे उद्घाटन

**दैनिक यशसिद्धि न्यूज**

दक्षिण सोलापूर/प्रतिनिधीः तालुक्यातील माळकवठे येथे आज मोठ्या जल्लोषात वंचित बहुजन आघाडीच्या शाखेचे उद्घाटन ४ जुलै २०२४ गुरुवारी रोजी सायंकाळी ६ वाजण्याच्या सुमारास संपन्न झाले. बरोबर ५ वाजण्याच्या सुमारास वंचित बहुजन आघाडी चे जिल्हाध्यक्ष चंद्रशेखर मडीखांबे जिल्हा सचिव अनिरुद्ध वाघमारे, युवक जिल्हाध्यक्ष पांडुरंग खांडेकर, जिल्हा संघटक जालिंदर चंदनशिवे,दक्षिण सोलापूर तालुकाध्यक्ष सुरेश देशमुख, माजी दक्षिण सोलापूर तालुकाध्यक्ष सचिन फडतरे यांच्यासह अन्य पदाधिकारांचे आगमन होताच फटाक्यांच्या आतिषबाजी ने स्वागत करण्यात आले.

त्यानंतर संपूर्ण गावातुन वरील पदाधिकाऱ्यांच्या समवेत गावकऱ्यांनी पद यात्रा काढण्यात आली. त्यानंतर बरोबर ६ वाजण्याच्या सुमारास वरील पदाधिकाऱ्यांनी तसेच हजारो कार्यकर्ते तसेच गावकऱ्याच्या साथीने वंचित बहुजन आघाडीच्या शाखेचे उद्घाटन करण्यात आले आणि वंचित बहुजन आघाडीच्या संपर्क कार्यालयाचे उद्घाटन करण्यात आले. त्यानंतर भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन ही करण्यात आले.



या कार्यक्रमास उपस्थित असलेल्या सर्व मान्यवरांचे यथोचित सत्कार करण्यात आला. तसेच माळकवठे येथील वंचित बहुजन आघाडीच्या ३ पदाधिकाऱ्यांचे वाढदिवस असल्यामुळे मंगळावरील मान्यवरांच्या साक्षीने वाढदिवस साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमाच्या संदर्भात वंचित बहुजन आघाडीच्या जिल्हाध्यक्षा चंद्रशेखर मडीखांबे यांनी अधिक माहिती पत्रकारांशी बोलताना अधिक माहिती दिली. या कार्यक्रमास वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष चंद्रशेखर मडीखांबे जिल्हा सचिव अनिरुध्द वाघमारे युवक जिल्हाध्यक्ष पांडुरंग खांडेकर जिल्हा संघटक जालिंदर चंदनशिवे दक्षिण सोलापूर तालुकाध्यक्ष सुरेश देशमुख माजी दक्षिण सोलापूर तालुकाध्यक्ष सचिन फडतरे सम्यक विद्यार्थी आंदोलन राज्य प्रवक्ता रविराज पोटे युवक जिल्हाध्यक्ष उपाध्यक्ष प्रकाश शिंदे,

दक्षिण सोलापूर महिला तालुकाध्यक्ष सुनिता साबळे, दक्षिण सोलापूर युवक तालुकाध्यक्ष अमर डुरके, अक्कलकोट शहराध्यक्ष विशाल ठोंबरे, दक्षिण सोलापूर युवक तालुका उपाध्यक्ष दिपक दुपारगुडे, दक्षिण सोलापूर युवक तालुका कार्याध्यक्ष यल्लप्पा गायकवाड, गावचे विद्यमान सरपंच राजशेखर सगरे ,माजी सरपंच तथा कार्यक्रमाचे मुख्य आधारस्तंभ माजी सरपंच उमेश वाघमारे, श्रीकृष्ण रणदिवे,माजी सैनिक सुरेश पाटील,रफिक शेख,कुतुबभाई शेख, ग्रामपंचायत सदस्य महेश बनसोडे प्रभावती गायकवाड,यांच्यासह माळकवठे गावातील ग्रामस्थांनी मंडळीसह मंद्रुप सादेपुर लवंगी मनगोळी,औज मंद्रुप तसेच पंचक्रोशीतील नागरिकांसह वंचित बहुजन आघाडीचे कार्यकर्ते बहुसंख्येने उपस्थित होते

या संपूर्ण कार्यक्रमाचे नियोजन माजी सरपंच तथा सामाजिक कार्यकर्ते उमेश वाघमारे यांनी केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तसेच या कार्यक्रमाचे आभारप्रदर्शन वंचित बहुजन आघाडीचे माजी तालुकाध्यक्ष सचिन फडतरे यांनी मांडले.

# सुसंस्कृत समाज घडविण्याची जबाबदारी समाजाची : अॅड.विजय भालेराव

**पुरंदर/दैनिक यशसिद्धि न्यूज**

सासवड तालुका विधी सेवा प्राधिकरण , सासवड व सासवड बार असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने मा. मुख्य मध्यस्ती केंद्र, उच्च न्यायालय मुंबई यांच्या निर्देशानुसार शनिवारी सकाळी ९ – १५ वाजता मध्यस्थी जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन शेठ गोविंद रघुनाथ साबळे कॉलेज ऑफ फार्मसी सासवड येथे करण्यात आले होते यावेळी लैंगिक गुन्ह्यापासुन मुलांचे संरक्षण या विषयावर बोलताना अँड .विजय भालेराव यांनी पुढील मत व्यक्त केले , बालकांचे हित साधण्याचे काम कायद्याने केले आहे,समाजानेच मुलांना सुसंस्कृत घडवावे त्यामुळे,सुसंस्कृत समाज घडवण्याची जबाबदारी ही समाजाची आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सासवड न्यायालयाचे प्रमुख न्यायधीश श्री. म.ताहेर बिलाल हे होते, तर प्रमुख उपस्थितीत श्रीमती एस. के. देशमुख मॅडम , श्री. महेश भरड सह दिवाणी न्यायाधीश हे उपस्थित होते,

अध्यक्षीय भाषणात बोलताना मा. माहेर बिलाल म्हणाले ,कायदा हा प्रत्येकाच्या जीवनात महत्वाचा असून , त्याचा सदोपयोग होणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांनी शिक्षणाचा उपयोग कुटुंब देशहित समाजहित व समाजातील गरीब



घटकांसाठी करावा , यासाठी मुलांनी फक्त पुस्तकाच्या अनुक्रमणिका न वाचता , संपूर्ण पुस्तक वाचणे आवश्यक आहे, असे ही मुख्य न्यायाधीश यांनी सांगितले,

सह दिवाणी न्यायाधीश श्रीमती एस .के. देशमुख मॅडम यांनी कायद्याचे पालन कसे करावे, कायद्याचे पालन करण्याची जबाबदारी प्रत्येकाची आहे. आपला अधिकार बजावताना दुसऱ्याच्या अधिकारावर गदा येणार नाही, यांची दक्षता घेणे आवश्यक आहे. त्याच बरोबर मुलांनी आपल्या कुटुंबासोबत आई वडीलांकडे आपले मन मोकळे करावे असे सांगितले,

मध्यस्थी एक दुवा या विषयावर अँड. महेश बारटक्के यांनी मार्गदर्शन केले ,जास्तीत जास्त तंटे मध्यस्थी द्वारे आपापसात मिळवावेत , मध्यस्थी हा दोन घटकामधील महत्वाचा दुवा आहे असे ही अँड बारटक्के म्हणाले, यावेळी कॉलेजच्या प्राचार्य डॉ. राजश्री चव्हाण उपप्राचार्य डॉ. स्मिता पवार, अँड. कलावंतांची फडतरे, बार असोसिएशनचे अध्यक्ष अँड बाबासाहेब पिलाणे, राहुल कोलते, मधुकर झिंजुर्के, दशरथ घोरपडे, सतिश राणे , उमेश आगवणे, रामदास भोसले, दत्तात्रय फडतरे व्यंकटेश बोरकर, आदी सासवड बार कौन्सिलचे मान्यवर पदाधिकारी उपस्थित होते, कार्यक्रमाचे आयोजन कॉलेज प्रशासन , अधिकारी संजय रोकडे, व तालुका विधी सेवा समितीचे वरिष्ठ लिपिक परशुराम देशमुख यांनी केले होते , कार्यक्रमाचे प्रास्ताविक जेष्ठ विधीतज्ञ अँड प्रकाश खाडे यांनी केले तर अँड. गणेश उरवणे यांनी उपस्थितांचे आभार मानले, तर मान्यवरांचे स्वागत कॉलेजच्या प्राचार्या डॉ. राजश्री चव्हाण यांनी केले, तर सुत्रसंचालन प्रा. श्र्वेता फडतरे यांनी केले,

# मडिखांबे यांच्या वाढदिवस विविध उपक्रमाने उत्साहात साजरा



**दैनिक यशसिद्धि न्यूज**

दुधनी/प्रतिनिधीः अक्कलकोट तालुका आरपीआय(आठवले गट)चे अध्यक्ष अविनाश मडीखांबे यांचे वाढदिवस तालुक्यात विविध उपक्रमांने मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आली आहे. रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा देशाचे सामाजिक न्याय राज्यमंत्री मा.ना.डॉ.रामदास आठवले,महिला अध्यक्षा सौ.सिममाताई आठवले,महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष राजाभाऊ सरवदे, जिल्हाध्यक्ष सोमनाथ भोसले,जिल्हा उपाध्यक्ष सैदप्पा झळकी, अशा पक्ष श्रेष्ठी सह तालुक्यातील मान्यवर आमदार श्री सचिन दादा कल्याणशेट्टी,मा सभापती आनंद तानवडे,मा नगराध्यक्ष मुत्तु खेडगी,सुनिल बंडगर,बसवराज सोनकांबळे,

महेश हिंडोळे,बाळासाहेब मोरे,आनंदराव सोनकांबळे यांनी फोनवर शुभेच्छा देण्यात आली आहे. दुधनी मराठी केंद्र शाळेत मुलांना शालेय साहित्य वाटप अविनाश मडिखांबे यांच्या वाढदिवसाच्याऔचित्य साधून जिल्हा परिषद प्राथमिक मराठी केंद्र शाळा दुधनी येथील विद्यार्थ्यांना वही पेन व खाऊ उपस्थित मान्यवरांच्या हस्ते वाटप दकरण्यात आली आहे. यावेळी दुधनी येथील आरपीआय जिल्हा उपाध्यक्ष सैदप्पा झळकी शहर अध्यक्ष तथा शाळा व्यवस्थापन समितिचे अध्यक्ष,गोरखनाथ धोडमनी,मुस्लीम आघाडिचे,मैहिदीमियाँ जिडगेदुधनी मुस्लिम समाजाचे अध्यक्ष जिलानी नाकेदार,हाबुसाब बळ्ळगीं,आजम शेखजी, गुरू धोडमनी, तिप्पण्णा गोटे,गोस शेखजी,नबीलाल जमादार मुख्याध्यापक श्रीसैल मलगाण सर,कोरचगाव सर,बेणेश्र्वर सर इतर मान्यवर उपस्थित होते.

# आजचा विद्यार्थी उद्याचा सक्षम नागरिक बनवणे ही शाळा व पालकांची जबाबदारी : अॅड सयाजी शिंदे



**दैनिक यशसिद्धि न्यूज**

सिदगाव/राजेंद्र बणजगोळे : नळदुर्ग ज्ञानदीप कलोपासक मंडळ नळदुर्ग संचलित धरित्री विद्यालय अलियाबाद येथे आज दिनांक ६ जुलै २०२४ रोजी इयत्ता ५ वी ते १० वीतील विद्यार्थ्यांच्या पालकांची बैठक घेण्यात आली. या बैठकीस ज्ञानदीप कलोपासक मंडळाचे सचिव मा.अँड सयाजी शिंदे, समाज सेवक व पालक सदस्य कमलाकर चव्हाण, आपलं घरचे व्यवस्थापक विलास वकील उपस्थित होते. प्रथम सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे मान्यवरांच्या हस्ते प्रतिमा पूजन करण्यात आले.त्यानंतर इयत्ता नववीतील विद्यार्थ्यांनींनी *इतिहासाचे रंग रूप हे स्वागत गीत सादर केले. महाराष्ट्र राज्य आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त मुख्याध्यापक सुनील पुजारी यांनी मान्यवरांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. जगताप गोरख यांनी कार्यक्रमाची प्रस्तावना केली. यानंतर वर्ग शिक्षकांनी आपापल्या वर्गाचा अहवाल विषय व विभागासह सादर केला. यानंतर उपस्थित पालकांचा सत्कार मान्यवरांच्या हस्ते पुष्प गुच्छ देऊन करण्यात आला.पालक शंका समाधानात काही पालकांनी रिक्त पदे शिक्षक भरती, शिष्यवृत्ती नियोजन, विद्यार्थी गुणवत्ता या विषयावर चर्चा केली. तसेच शाळेच्या कामकाजाबद्दल समाधान व्यक्त केले. संस्थेचे सचिव अँड सयाजी शिंदे यांनी आपल्या मार्गदर्शनातून पालकांची जबाबदारी व फीडबॅक याचे महत्त्व सांगितले. विद्यार्थ्यांची आकलन क्षमता त्यांनी रामू नावाच्या मुलाच्या गोष्टीतून सांगितली.तसेच आजचा विद्यार्थी उद्याचा सक्षम नागरिक बनण्यासाठी शिक्षक,पालक व बालक यांच्यात सुसंवाद होणे आवश्यक असल्याचे सांगितले. त्यांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी संस्था व शाळा सदैव तत्पर राहील असे आश्र्वासन पालकांना दिले. पालक सदस्य कमलाकर चव्हाण यांनी महिला पालकांचे महत्त्व व कर्तव्य पालकांसमोर मांडले. तसेच मोबाईलच्या अतिवापराचे दुष्परिणाम पालकांसमोर विशद केले.शाळेचे महाराष्ट्र राज्य आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त मुख्याध्यापक सुनील पुजारी यांनी आपल्या मनोगतात विद्यार्थ्यांची ऑनलाईन नोंदणी, शासनाच्या योजना व नवभारत साक्षरता अभियान ,पालकांचे सहकार्य व शाळेची जबाबदारी या महत्त्वाच्या विषयांवर चर्चा केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सातलगावकर अण्णाप्पा यांनी केले तर आभार चव्हाण रमेश यांनी मानले. आजच्या बैठकीसाठी मुख्याध्यापकांचे मार्गदर्शन,सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी जगदेवी शंकर शेट्टी,विठ्ठल पाटील यांचे सहकार्य लाभले. खेळी मेळीच्या वातावरणात शिक्षक पालक बैठक संपन्न झाली.



# बोपगाव येथील जि प प्राथमिक शाळेत विठू नामाच्या गजरात रंगला पालखी सोहळा.

**पुरंदर/दैनिक यशसिद्धि न्यूज**

पान फुलांनी सजवलेली माऊलींची पालखी,पारंपरिक पोशाख. विठू माऊली तू माऊली जगाची माऊलीत मूर्ति विठ्ठलाची विठ्ठला मायबापा.

असे अभंग गात माऊली माऊली चा गजर आणि ज्ञानोबा –तुकाराम चा जयघोष करत जि प प्राथमीक शाळेतील इयत्ता पहिली ते सातवी मधील विद्यार्थी व विद्यार्थींनी हरिनामाच्या गजरात भक्तीमय वातावरणामध्ये चिमुकले रंगून गेले होते विठ्ठल रुक्मिणीच्या वेषात वारकऱ्यांच्या वेशभूषेत, डोक्यावर तुळस घेऊन सर्व चिमुकल्यांचा भक्तिमय वातावरणामध्ये सहभाग होता विना, टाळ,मृदुंग,हाती घेऊन ज्ञानोबा- तुकारामाचे जय घोषात संपूर्ण गावांमधून माऊलींचा पालखी सोहळा रंगला. करील पंढरीची वारी आलो देवा तुझ्या दारी याप्रसंगी देहू ते पंढरपूर तुकाराम महाराजांचा पालखी सोहळा,कसा निघतो तसेच आळंदी ते पंढरपूर संत ज्ञानेश्वर माऊलींचा पालखी सोहळा,विषयी तसेच सासवड ते पंढरपूर संत सोपान काका महाराज पालखी सोहळा,विषयी विद्यार्थ्यांना माहिती देण्यात आली यावेळी जवळजवळ १६० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.या पालखी सोहळ्याचे नियोजन मुख्याध्यापिका सौ कानडे मॅडम व त्यांच्या सहकारी सौ अशा बोरकर मॅडम,सौ पवार मॅडम, सौ धुमाळ मॅडम, सो सारिका जगताप मॅडम,सौ शिंदे मॅडम,सौ जगताप मॅडम या सर्वांनी केले.

# स्वेरी फार्मसीच्या डॉ. वृणाल मोरे, डॉ. मिथुन मणियार व डॉ. प्राजक्ता खुळे यांना राष्ट्रीय पेटंट प्राप्त

**दैनिक यशसिद्धि न्यूज**

पंढरपूर/प्रतिनिधी : 'गोपाळपूर (ता. पंढरपूर) येथील श्री.विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिट्यूट संचलित कॉलेज ऑफ फार्मसीच्या डॉ. वृणाल मोरे, डॉ. मिथुन मणियार व डॉ. प्राजक्ता खुळे यांनी फाईल केलेल्या पेटंटला भारत सरकारच्या पेटंट विभागाकडून मान्यता प्राप्त झाली आहे.' अशी माहिती कॉलेज ऑफ फार्मसीचे प्राचार्य डॉ. मिथुन मणियार यांनी दिली. फार्मसीच्या क्षेत्रामध्ये सातत्याने नवनवीन गोष्टींचे संशोधन चालू असते. फार्मसी क्षेत्रात औषधनिर्माण करणाऱ्या ज्या कंपन्या तसेच फार्मसी महाविद्यालये आहेत त्या ठिकाणी विविध पद्धतीच्या उपकरणांची आवश्यकता असते. स्वेरी फार्मसीच्या डॉ. वृणाल मोरे, डॉ. मिथुन मणियार व डॉ. प्राजक्ता खुळे यांनी 'ऑटोमॅटिक टॅब्लेट वेट व्हेरिएशन' या नावाचे उपकरण बनवले आहे. हे उपकरण टॅब्लेट्स साठी भारत सरकारच्या इंडियन फार्मास्टँडर्ड्स जे की 'स्वास्थ्य एवंम परिवार कल्याण केंद्र मंत्रालय' यांनी प्रसिद्ध केलेल्या टॅब्लेट्स तपासणी साठी दिलेल्या चाचण्यांमधील वेट व्हेरीएशन चाचणी साठी उपयुक्त होणार आहे. या मशीनमध्ये अद्ययावत डिस्प्ले वापरले आहे. ज्यात टॅब्लेट्सच वजन, घेतलेल्या टॅब्लेट्सचे सरासरी वजन तसेच त्या टॅबलेट चाचणी नंतर योग्य किंवा अयोग्य आहेत हे दर्शविले जाते. यापूर्वीच्या मशीन मध्ये फक्त एकावेळी एक टॅबलेटचे वजन घेतले जात होते. आता या डिस्प्लेमध्ये तीन प्रकारच्या रिडिंग दिसू शकतील. ह्यातील अजून एक महत्वाची



गोष्ट म्हणजे, जर वजनासाठी ठेवल्या गेलेल्या बॅच मध्ये दोन किंवा दोन पेक्षा जास्त टॅब्लेट्स जर निर्धारित मर्यादेच्या बाहेर असतील तर त्यामध्ये असणारा बझ्झर वाजेल. अशा या नवीन उपकरणामुळे टॅबलेट विभागामध्ये काम करणाऱ्या लोकांचे अधिकचे परिश्रम वाचणार आहेत. एकूणच हे उपकरण फार्मसी च्या कंपन्यामध्ये व फार्मसी महाविद्यालामध्ये फायदेशीर आहे असे या पेटंट चे मुख्य संशोधक डॉ. वृणाल मोरे यांनी सांगितले. भारत सरकारच्या पेटंट कार्यालयाकडून ह्या उपकरणाच्या पेटंटचे प्रमाणपत्र मिळाले आहे. हे पेटंट फार्मसी कॉलेजचे डॉ. वृणाल मोरे, स्वेरीचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ. बी.पी.रोंगे, संस्थेचे विश्र्वस्त प्रा.सुरज रोंगे, फार्मसीचे प्राचार्य डॉ. मिथुन मणियार, डॉ. प्राजक्ता खुळे, डॉ. दत्तात्रय यादव व प्रा.सिद्धिका इनामदार यांनी फाईल केले होते. त्यावर बरेच दिवस काम केल्यानंतर त्यांना हे यश मिळाले आहे.

या यशाबद्दल संस्थेचे संस्थापक सचिव व प्राचार्य डॉ.बी.पी.रोंगे, संस्थेचे अध्यक्ष दादासाहेब रोंगे, उपाध्यक्ष हनीफ शेख तसेच संस्थेचे विश्र्वस्त व पदाधिकारी, पुण्यश्र्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूरच्या विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे प्रभारी अधिष्ठाता डॉ. प्रशांत पवार, स्वेरी कॅम्पस इन्चार्ज डॉ. एम.एम. पवार, कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग च्या उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार, बी.फार्मसीचे प्राचार्य डॉ. एम. जी. मणियार, अधिष्ठाता, सर्व विभागप्रमुख, प्राध्यापक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी यांनी अभिनंदन केले.

# महिला सक्षमीकरणासाठी विविध योजनांच्या माध्यमातून शासन कटीबद्ध; पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांचे प्रतिपादन

*** मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतून राज्यातील तीन कोटी महिलांना लाभ मिळणार * राज्य शासनाने महिलांना प्रतिवर्षी तीन गॅस सिलेंडर मोफत देण्याचा निर्णय घेतला * स्वत:च्या कुटुंबाला अर्थसहाय्य मिळावे यासाठी शासनाने महिलांसाठी पिंक ऑटो योजना लागू केली आहे यामध्ये दहा टक्के रक्कम भरून पिंक कलरची ऑटो महिलांना देण्यात येणार आहे. * महाविद्यालयात कायमस्वरूपी प्राध्यापक उपलब्ध करून देणार**

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

सोलापूर/प्रतिनिधीः राज्य शासन महिलांच्या सक्षमीकरणासाठी विविध योजना राबवत आहे. यामध्ये मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना, महिलांना वर्षभरात तीन सिलेंडर मोफत, आश्रम शाळा मधील १८ वर्षांपुढील मुलींना शिक्षण शुल्क माफ, पिंक रिक्षा योजना, लेक लाडकी योजनेसह अन्य योजनांचा समावेश आहे. अशा योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीतून महिलांना मुख्य प्रवाहात आणून त्यांचे सक्षमीकरण करण्यासाठी शासन कटिबद्ध असल्याचे प्रतिपादन उच्च व तंत्र शिक्षण, वस्त्रोद्योग व संसदीय कार्यमंत्री तथा पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी केले.

अनुसयाबाई रामचंद्र बुर्ला महिला वरिष्ठ महाविद्यालयाच्या विद्यार्थिनीच्या कृतज्ञता मेळाव्यात पालकमंत्री चंद्रकांत पाटील मार्गदर्शन करत होते. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य टी.एन. शिंदे, पद्मशाली शिक्षण संस्थेचे सचिव दशरथ गोप, आई प्रतिष्ठानचे अध्यक्ष मोहन डांगरे आदी उपस्थित होते.

पालकमंत्री चंद्रकांत पाटील पुढे म्हणाले की, राज्याचे मुख्यमंत्री महोदय यांनी नुकतेच मुख्यमंत्री माजी लाडकी बहीण योजना जाहीर केली असून त्याच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने प्रशासकीय स्तरावर कार्यवाही सुरू आहे. या योजनेच्या माध्यमातून राज्यातील तीन कोटी महिलांना प्रतिमहा १५०० रुपये थेट त्यांच्या बँक खात्यावर उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. या योजनेसाठी प्रतिवर्षी शासनाने ४६ हजार कोटीची तरतूद केलेली आहे. शासनाने महिलांना स्वतःच्या पायावर उभे राहण्यासाठी पिंक रिक्षा योजना सुरू केली असून या योजनेअंतर्गत दहा टक्के रक्कम भरून शासन महिलांना गुलाबी रंगाची रिक्षा घेण्यासाठी अर्थसहाय्य देणार आहे, असे ही त्यांनी सांगितले.

तसेच वर्षभरात महिलांना तीन गॅस सिलेंडर मोफत देण्यात येणार आहेत. उच्च शिक्षणासाठी मुलींना शंभर टक्के फी माफी केलेली आहे. लेक लाडकी योजनेतून मुलीच्या जन्मानंतर तिच्या बँक खात्यावर एक लाख दोन हजाराचे अर्थसहाय्य शासन जमा करत आहे.

शासन महिलांसाठी विविध योजना राबवून त्यांना मुख्य प्रवाहात आणून पुरुषाच्या बरोबरीने सक्षम करण्यासाठी प्रयत्नशील आहे. यासाठी महिला बचत गटांना सवलतीच्या दराने कर्ज उपलब्ध




केले जात आहे आरोग्यासाठी विविध योजना राबवल्या जात आहेत या सर्व योजनांचा राज्यातील महिलांनी लाभ घ्यावा असे आवाहन पालकमंत्री पाटील यांनी केले. ए.आर बुर्ला महाविद्यालयासाठी विशेष बाब म्हणून कायमस्वरूपी शिक्षक व मुलींना हद्दवाढ भागात मोफत बस पास देणे आणि एक कार्यक्रमासाठी एक सभागृह बांधून देण्याची ग्वाही यावेळी त्यांनी दिली.

यावेळी प्रस्ताविक मोहन डांगरे यांनी केले. विद्यार्थ्यांच्या वतीने कला शाखेचे विद्यार्थिनी प्राची भोसले यांनी आपले मनोगत व्यक्त केले. तर दशरथ गोप यांनी पद्मशाली शिक्षण संस्थेचे शैक्षणिक क्षेत्रातील कार्य

याविषयी माहिती दिली. तसेच राज्य शासनाने मुलींना मोफत शिक्षणाची सुविधा उपलब्ध करून दिल्याबद्दल शासनाचे त्यांनी आभार मानले. या कृतज्ञता मेळाव्यास महाविद्यालयातील विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

## उर्दूघर येथे १४ जुलैपासून उर्दूभाषा शिकण्याचे वर्ग सुरू होणार : सदाशिव पड्डुने

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

सोलापूर/प्रतिनिधीः सोलापूर उर्दू घर इमारतीचे दिनांक ०७ मार्च २०२४ रोजी लोकार्पण सोहळा संपन्न झाला आहे त्या अनुषंगाने उर्दू भाषेचे प्रगती, विस्तार व प्रसारासाठी उर्दू भाषा शिकण्याची संधी मराठी व इतर भाषिक लोकांना करून देण्यात येणार असून त्या करिता १४ जुलै २०२४ पासून दर रविवारी सकाळी १० ते ११ या वेळेत वर्गाचे सुरवात होणार आहे. तरी इच्छुक नागरीक व विद्यार्थी यांनी नांव नोंदणी करणे करिता व्यवस्थापक सोलापूर उर्दू घर यांचेशी संपर्क साधावा, असे आवाहन प्रांताधिकारी तथा उर्दू घर सांस्कृतिक समितीचे उपाध्यक्ष सदाशिव पडदुने यांनी केले आहे. तसेच उर्दु घर येथे विद्यर्थ्यांना अभ्यासा करिता कक्ष उपलब्ध असून त्यांनी ग्रंथपाल सोलापूर उर्दू घर याच्यांशी संपर्क साधून नाव नोंदणी करावी. सोलापुरातील ज्या काही संस्था/ प्रतिष्ठीत नागरीक हे उर्दु घर करिता सर्व भाषिक ग्रंथ, कादंबरी इतर स्पर्धा परिक्षा पुस्तके उपलब्ध करून देणार आहेत. व सोलापूर मधील जे कलावंत, कवी, गायक विनामूल्य सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यास इच्छूक असतील त्यांनी व्यवस्थापक यांचेशी संपर्क साधावा. उर्दु घर व्यवस्थापक यांचा संपर्क क्रमांक ९४२२५३२७८६ हा आहे.

## खर्चाचे नियोजन करण्यासाठी सीईओ मनीषा आवळे यांची लक्ष्मी टाकळी परिसरात भेट

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

पंढरपूर/प्रतिनिधीः या लक्ष्मी टाकळी ग्रामपंचायत मध्ये विविध विकास कामाच्या संदर्भात जिल्हा परिषदेच्या मुख्याधिकारी यांनी ग्रामपंचायतीला प्रथमच भेट दिली.महाराष्ट्राचे लोकप्रिय मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या



आशीर्वादाने लक्ष्मी टाकळी ग्रामपंचायत येथील आषाढी वारीसाठी निधी नियोजनामध्ये समाविष्ट करण्यात आला आहे सदरच्या निधी ग्रामपंचायतकडे वर्ग करण्यात आला आहे. प्रथम देश स्वतंत्र झाल्यापासून लक्ष्मी टाकळी ग्रामपंचायत ही आषाढी वारी निधी नियोजनामध्ये समाविष्ट करण्यात आला आहे या दिलेल्या निधीचे नियोजन करण्यासाठी सोलापूर जिल्हा परिषद मुख्य अधिकारी मनीषा आवळे अतिरिक्त मुख्य अधिकारी श्रीखंडे अमोल जाधव गटविकास अधिकारी सुशील संसारे ग्रामपंचायत सरपंच संजय साठे उपसरपंच महादेव पवार ग्रामसेवक जयवंत खंडागळे ग्रामपंचायत सदस्य सर्व कर्मचारी उपस्थित होते.

आषाढी वारी मध्ये होणाऱ्या पुढील कामाची रूपरेषा ठरवण्यासाठी सर्व अधिकारी उपस्थित होते यावेळी टाकळी ग्रामपंचायत मध्ये विशेष प्रयत्न करून केलेल्या कालावधी व बंधारा पाहणी मुख्य कार्यकारी अधिकारी मनीषा आवळे यांनी करून सर्व ग्रामपंचायत सरपंच उपसरपंच सदस्य ग्रामसेवक कर्मचारी यांची कौतुक करून अभिनंदन केली. सदर या कामासाठी कसलाही निधीची कमी पडू देणार नाही असे वचनही देण्यात आली हा केलेला उपक्रम स्तुत्य आहे असे गौरविण्यात आले यावेळी साठे बंधू यांचे विठाई सदन या निवासस्थानी त्यांचा सत्कार व सन्मान करण्यात आला



## सीपीआरची माहिती सर्वांना असणे आवश्यक : डॉ.शरणकुमार पाटील

**दैनिक यशसिध्दि न्यूज**



अक्कलकोट/प्रतिनिधीः सीपीआर (कार्डिओपल्मोनरी रिसुसिटेशन)ही एकआपत्कालीन प्रक्रिया आहे ज्याची माहिती प्रत्येकाना असणे गरजेचे आहे. छातीवर विशिष्ट पद्धतीने दाब किंवा तोंडाला तोंडावर दाबून कृत्रिम श्र्वासोच्छ्वास दिल्याने एखाद्याचे जीव वाचु शकते. याची माहिती विद्यार्थी दशेतच असावे वा त्याची नेहमी उजळणी करावे असे मनोगत डाँ. शरणकुमार पाटील यांनी व्यक्त केले. शनिवारी येथील मराठा मंदिर श्री शहाजी प्रशालेत पाटील कुंटुंबियाच्या वतीने शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले आपातकालीन सीपीआर प्रणाली बाबत माहिती देताना ते बोलत होते.

डाँ. पाटील कुंटुंबियाच्या वतीने येथील गरजु मुला मुलींना वह्या, पुस्तके, कंपासपेटी, बँग आदी शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. पुढे बोलताना डाँ.पाटील म्हणाले, आपातकाळामध्ये प्राथमिक उपचार करणे गरजेचे आहे.

घशात काही अडकल्यास, कोणाची शुद्ध हरविल्यास काय उपाययोजना करावे याबाबत प्रात्यक्षिकासह माहिती दिली.स्वागत व प्रास्तविक वाय.पी. कबाडे यांनी केले. ए.एस.कोरे यांनी मनोगत व्यक्त केले. सुत्रसंचालन एस.एन.गायकवाड यांनी केले तर आभार ए.बी.शिंदे यांनी मानले.

यावेळी डाँ.शरणकुमार पाटील, डाँ.अमृता पाटील, डाँ.प्राजक्ता पाटील धरणे, कुमुदिनी पाटील, उज्वला पाटील, जे.एस.बगले, एम.एम.साळुंखे, आर.ए.जाधव आदीसह शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी विद्यार्थी विद्यार्थ्यांनी उपस्थित होते.

## भाविकांनो काळजी घ्या..! आषाढी यात्रेस यंदा झीका चे सावट: आरोग्य विभाग अलर्ट धूर फवारणी करणार

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

पंढरपूर/प्रतिनिधीःराज्यात पुणे, मुंबई आधी मोठ्या शहरात झिका, व्हायरसचे रुग्णा आढळत आहेत त्यामुळे आषाढी यात्रा यात्रेवर जिंका आहे व्हायरसचे सावट असल्याने आरोग्य विभाग सतर्क झाला असून भाविकांना आरोग्यसेवा पुरवण्यासाठी आरोग्य विभाग प्रशासन सज्ज झाले आहे.

ाषाढी यात्रेस पंढरपूर येथील विठुरायाच्या दर्शनासाठी १५ लाखाहून अधिक भाविक येणार असल्याचे अंदाज प्रशासनाकडून व्यक्त केला जात आहे त्यामुळे यात्रेस येणाऱ्या भाविकांना सुविधा देण्यासाठी प्रशासनाने तयारी सुरू यात्रा कालावधीत राज्यातील विविध भागातून तसेच कर्नाटक, आंध्रा, मध्य प्रदेश, प्रदेश, उत्तर प्रदेश, मोठ्या प्रमाणावर भाविक येत असतात भाविक पंढरपूरला येतात सध्या मात्र राज्यातील मुंबई पुणे येथे जिंका व्हायरसचे सर्वात जास्त रुण आढळले आहेत

केंद्र शासनाने राज्य शासनाला जिंका रुग्णाच्या आरोग्याची काळजी घ्या अशा सूचना दिल्या आहेत

तसेच लवकरच लवकर याबाबत उपाययोजना करा असे पत्र आरोग्य विभागाला देण्यात आले आहे पाश्र्वभूमीवर पंढरपूर येथे आषाढी यात्रेनिमित्त महाराष्ट्र विविध राज्यातून मोठ्या प्रमाणात भाविक येत असतात त्यामुळे आषाढी यात्रेस जिंकाच्या रुग्णाची संख्या वाढवणे यासाठी आरोग्य विभाग सतर्क झाला आहे

**तीन तखाने महा आरोग्य शिबिर..**

**यात्रा कालावधीत पंढरपूरला येणाऱ्या भाविकांची आरोग्य तपासणी करण्यात येणार आहे यासाठी पंढरपूर शहरात विविध तीन ठिकाणी महा आरोग्य शिबिर आयोजित केले आहे या शिबिरात भाविकांची तपासणी करून औषधोपचार देण्यात येणार आहेत भाविकांना वैद्यकीय सुविधा मिळावी म्हणून ६५ एकर दर्शन मंडप चंद्रभागा वाळवंट बस स्थानक रेल्वे स्थानक या ठिकाणी प्राथमिक आरोग्य केंद्र सुरू करण्यात आले आहेत भाविकांना कोणताही त्रास होऊ नये याची दक्षता आरोग्य विभागाने घेतली आहे**

**झिका व्हायरस :डेंगू सारख्या आजार आहे यामुळे रुग्णाला ताप येतो त्यामुळे ग्रामीण भागात ग्रामपंचायत आणि आरोग्य विभाग या शहरांमध्ये नगरपालिका नगरपंचायतीच्या माध्यमातून दोन दिवसात धूर फवारणी सह इतर आरोग्य सुविधा पालखी सोहळ्या बरोबर येणाऱ्या भाविकांना देण्यात येतील – डॉ.एकनाथ बोधली आरोग्य अधिकारी पंढरपूर तालुका**


## मुख्यमंत्री–माझी लाडकी बहिण योजनेचे अर्ज मोफत भरणेच्या शिबिराचे आयोजन


**अभिजीत पाटील यांचा देवडे गांवातील महिलांना मदतीचा हात**

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

पंढरपूर/प्रतिनिधीः श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन श्री अभिजीत आबा पाटील यांच्या संकल्पनेतून पंढरपूर तालुक्यातील मौजे देवडे गांवातील लाभार्थी महिलांना ग्रामपंचायत कार्यालय, देवडे येथे शुक्रवार दि.०५.०७.२०२४ रोजी मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेचे अर्ज मोफत भरून देण्यात आले आहेत.

सदरचे अर्ज हे ऑफलाईन भरून घेऊन नंतर ऑनलाईन करीत आहोत. मुख्यमंत्री–माझी लाडकी बहिण योजनेच्या लाभार्थी महिलांना या योजनेचा लाभ घेणेसाठी काही तांत्रिक अडचणी येत असल्यामुळे त्यांची होणारी धावाधाव लक्षात घेऊन भावी आमदार श्री अभिजीत आबा पाटील यांनी पंढरपूर तालुक्यातील मौजे देवडे येथे घेतलेल्या या शिबिराप्रमाणेच संपुर्ण तालुक्यामध्ये सदर योजनेची शिबीरे घेण्याचा त्यांचा मानस आहे.चेअरमन श्री अभिजीत आबांच्या या उपक्रमाला महिलांचा चांगला प्रतिसाद मिळत असून, या योजनेचे अर्ज पंढरपूर तालुक्यातील देवडे गावातून सर्वात जास्त भरलेले असून देवडे गांव हे प्रथम क्रमांकावर आहे. चेअरमन श्री अभिजीत आबांच्या या स्तुत्य उपक्रमाला जनतेतून चांगला प्रतिसाद मिळत असल्याचे दिसून येते. मुख्यमंत्री- माझी लाडकी बहिण योजन या योजनेचे शिबीर यशस्वी होणेसाठी देवडे गांवचे सरपंच श्री सोमनाथ झांबरे सर मित्र परिवार यांनी परिश्रम घेतले.





## करमाळ्यात सर्व पक्षी संघटनेच्या वतीने प्रहार संघटनेचे जिल्हा सरचिटणीसपदी बापू तळेकर

### स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या कार्याध्यक्षपदी बापू वाडेकर यांची निवड झाल्याबद्दल सत्कार

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

पंढरपूर/प्रतिनिधीः करमाळा शहरांमध्ये सर्वपक्षीय संघटनेच्या वतीने प्रहार जनशक्ती संघटनेचे जिल्हा सरचिटणीस पदी नेते तळेकर यांची व स्वाभिमानी शेतकरी संघटना कार्याध्यक्षपदी बापू वाडेकर यांची निवड झाल्याबद्दल सर्वपक्षीय संघटनेच्या वतीने सत्कार करण्यात आला.

त्यामध्ये दत्तकला शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्राध्यापक रामदास झोळसर शेतकरी कामगार संघटनेचे दर्शन त्यांना कांबळे

मराठा सेवा संघ तालुकाध्यक्ष सचिन काळे प्रहार जनशक्ती संघटना तालुका अध्यक्ष संदीप तळेकर राष्ट्रवादी काँग्रेसचे शरद पवार गट तालुका अध्यक्ष संतोष वारे उद्धव बाळासाहेब ठाकरे युवा सेना तालुका अध्यक्ष समाधान बर्थडे स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हा उपाध्यक्ष रवींद्र गोडगे तालुका उपाध्यक्ष बापू फरतडे शिवसेनेचे बंडू शिंदे मकाईचे माजी संचालक हरिभाऊ झिंजाडे रेटेवाडी योजना संघर्ष समितीचे शहाजी माने सोलापूर जिल्हा नेते गणेश मंगवडे गोपीनाथ पाटील सर यांच्या हस्ते उपस्थित नूतन पदाधिकारी बापू तळेकर बापू वाडेकर यांचा शाल हार श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला करमाळ्यात सर्वपक्षीय संघटनेच्या वतीने सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून सत्कार करून शुभेच्छा दिल्याबद्दल सामाजिक समस्येचे दर्शन घडवल्याबद्दल सर्वत्र कौतुक होत आहे